## प्रकरण - १ ले.

१. १ विषय प्रवेश.

१. २ संशोधनाचा विषय.

१. ३ संशोधनाची उद्दिष्टे.

१. ४ संशोधन विषयाचे महत्व.

१. ५ संशोधनाची व्याप्ती व मर्यादा.

१. ६ संबंधित संशोधनाचा अभ्यास.

१. ७ संशोधनाची कार्य पद्धती.

१. ८ प्रकरणाचे सुसूत्रीकरण.

संदर्भ.

::::::::::::

१.१ विषय प्रवेश -

महाराष्ट्र म्हणजे कर्मयोग्यांची कर्मभूमी आहे. कर्म क्षेत्र विराट आहे. पण अगदी थोडीच माणसे कर्मयोगी होतात. शिक्षणाच्या भक्कम पायावरच मानवाच्या यशाचे मंदीर उभे राहाते. शिक्षणाच्या ज्ञान-यज्ञात अनेक शिक्षण प्रेमी व समाजसुधारकानी आपले सर्वस्व अर्पण केले आहे. महात्मा ज्योतीबा फुले, राजर्षी शाहू महाराज, महर्षि वि. रा. शिंदे, महर्षि आण्णासाहेब कर्वे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, डॉ. पंजाबराव देशमुख, कर्मवीर भाऊराव पाटील, कर्मवीर घोगरे, कर्मवीर मामासाहेब जगदाळे, गुरुवर्य बाबूराव जगताप या शिक्षण प्रसारकांच्या मालिकेतील एक रत्न म्हणजे शिक्षण महर्षि डॉ. बापूजी साळुंखे यांचे शिक्षण प्रसाराचे कार्य विशाल आहे ते सर्वांना स्फूर्ती व प्रेरणा देणारे आहे.

एखादी व्यक्ती विशिष्ट प्रकारचे कार्य करते त्यामुळे समाज परिवर्तनास मदत होते. त्या व्यक्तींच्या आचार विचारांचा समाजावर प्रभाव पडत असतो. स्वातंत्र्यापूर्वी व स्वातंत्र्यानंतर ही समाजसुधारकांनी शिक्षण हेच समाजसुधारणेचे माध्यम मानलेले दिसून येते. स्वातंत्र्यानंतरही समाजात अनिष्ठ रुढी, जातीभेद, शिक्षणाबाबतची अनास्था, शिक्षणाच्या गैरसोयी या बाबी चालूच होत्या. त्या नष्ट करण्यासाठी शिक्षण महर्षि डॉ. बापूजी साळुंखे व इतर शिक्षण प्रसारकांनी प्रयत्न केले. त्यांनी शिक्षण प्रसारासाठी केलेले प्रयत्न अभ्यासकास महत्वाचे वाटले. तसेच संशोधक स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या रामकृष्ण परमहंस महाविद्यालय, उस्मानाबाद या शाखेचा विद्यार्थी असल्याने व बापूजींच्या कांही दिवस सान्निध्यात आल्याने त्यांच्या शैक्षणिक कार्याने प्रेरित झाला आणि संशोधनासाठी खालील प्रमाणे विषय घेतला.

## १.२ संशोधनाचा विषय -

" शिक्षण महर्षि डॉ. बापूजी साळुंखे यानी महाराष्ट्र राज्यामध्ये शैक्षणिक क्षेत्रात केलेल्या कार्याचा चिकित्सक अभ्यास करणे. "
संशोधन विषयाची मांडणी करताना विविध शब्दांचा वापर झाला आहे. अभ्यासकाने विशिष्ट शब्दाचा कोणता अर्थ गृहीत धरला आहे यासाठी व त्या शब्दांची व्याप्ती समजण्यासाठी संशोधन विषयातील शब्दांचा अर्थ पुढीलप्रमाणे दिला आहे.

### महाराष्ट्र राज्य -

महाराष्ट्र व कर्नाटक या दोन्ही राज्यात बापूजीचे शिक्षण प्रसाराचे कार्य असले तरी फक्त महाराष्ट्र राज्यातील बापूजींच्या शैक्षणिक कार्याचा संशोधकाने प्रस्तुत संशोधनात विचार केला. प्राध्यापक सी. डी. देशपांडे यांनी आपल्या "महाराष्ट्राचा भूगोल" या पुस्तकात महाराष्ट्र राज्याची व्याख्या पुढीलप्रमाणे केली आहे.

> " महाराष्ट्र राज्य म्हणजे भारतीय संघराज्यातील एक प्रमुख घटक राज्य होय. या राज्याचे भारतीय द्वीपकल्पामध्ये मध्यवर्ती स्थान असून अनेक बाबतीत उत्तर व दक्षिणेच्या भौगोलिक व सांस्कृतिक परिस्थितीचे येथे संमिश्रण झालेले आढळते. "१.

१ मे १९६० रोजी या राज्याची प्रादेशिक व भावनिक दृष्टया निर्मिती झाली. सर्व मराठी भाषीक प्रदेशाचा त्यात समावेश करण्यात आला असून कोकण देश, मराठवाडा, विदर्भ असे स्थूलमानाने चार विभाग पाडले जातात. बापूजीचे कार्यक्षेत्र कोकण, देश, मराठवाडा या तीन विभागात पसरले असल्याने महाराष्ट्र राज्य हा शब्द प्रयोग वापरला आहे.

### शैक्षणिक क्षेत्र -

संगीत, साहित्य, कला, क्रीडा, संशोधन , वैद्यकीय सेवा, समाजसेवा इत्यादी कार्यक्षेत्राप्रमाणे शिक्षण हे एक कार्यक्षेत्र आहे.

प्राथमिक शिक्षण, माध्यमिक शिक्षण, उच्च शिक्षण, तंत्र शिक्षण, शिक्षक प्रशिक्षण, या शिक्षणाच्या सर्व स्तरांचा विचार शैक्षणिक क्षेत्र या संज्ञेत अभ्यासकाने गृहीत धरला आहे.

चिकित्सक अभ्यास -

या संशोधनात बापूजी साळुंखे यांनी शैक्षणिक क्षेत्रात शिक्षण प्रसारासाठी जे विविध प्रयत्न केले त्या प्रयत्नांचा चिकित्सक अभ्यास केला आहे. Dictionary of Education मध्ये Carter V. Good यांनी चिकित्सक अभ्यास याचा इंग्रजीमध्ये अर्थ खालीलप्रमाणे दिला आहे.

CRITICAL STUDY-

> The term study implies the pursuit of some branch of knowledge, A critidal study means, a thorough or complete study of the subject. This Indicates that the study is of a skillful and decisive nature, It is a meaningful inquiry."2.

अभ्यास म्हणजे ज्ञानाच्या कोणत्याही शाखेचा केलेला पाठपुरावा होय. एखादा विषयाचा सखोल व परिपूर्ण केलेला अभ्यास म्हणजे चिकित्सक अभ्यास होय. यावरून कुशल आणि निर्णयात्मक अभ्यासाचे स्वरूप सुचीत होते. अशा प्रकारचा अभ्यास म्हणजे एखादा विषयाचा अर्थपूर्ण शोध होय.

१.३ संशोधनाची उद्दिष्टे -

संशोधनाची उद्दिष्टे खालीलप्रमाणे होती.

१] शिक्षण महर्षि डॉ. बापूजी साळुंखे यांनी मांडलेल्या शैक्षणिक तत्वज्ञानाचा अभ्यास करणे.

२] शिक्षण महर्षि डॉ. बापूजी साळुंखे यांनी ग्रामीण भागात बहुजन समाजासाठी शैक्षणिक क्षेत्रात केलेल्या कार्याचा अभ्यास करणे.

३] शिक्षण महर्षि डॉ. बापूजी साळुंखे यांचा स्त्री शिक्षण विषयक दृष्टीकोन समजावून घेणे व स्त्री शिक्षण प्रसारासाठी केलेल्या प्रयत्नाचा अभ्यास करणे.

४] शिक्षण महर्षि डॉ. बापूजी साळुंखे यांचे वसतिगृहासंबधीचे कार्य व वसतिगृहातील मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी केलेल्या प्रयत्नांचा अभ्यास करणे.

५] शिक्षण महर्षि डॉ. बापूजी साळुंखे यानी शिक्षणाच्या माध्यमातून समाजपरिवर्तनासाठी केलेल्या प्रयत्नांचा अभ्यास करणे.

१.४ <u>संशोधन विषयाचे महत्व</u> -

ग्रामीण व आदिवासी भागात शिक्षण महर्षि डॉ. बापूजी साळुंखे यानी शिक्षणाचा प्रसार घडवून आणला. त्यासाठी त्यांनी ठिठिकाणी वसतिगृहे स्थापन केली. वसतिगृहामध्ये निरनिराळ्या जातीच्या मुलाना प्रवेश दिला. संस्थेमध्ये नोकर वर्गाची भरती करताना कोणत्याही जातीच्या उमेदवाराना सामावून घेतले. बापूजीनी वसतिगृहाच्या माध्यमातून सामाजिक एकता निर्माण करण्याचा प्रयत्न केला. बापूजीनी स्त्रीयांचा सामाजिक दर्जा उंचावण्यासाठी प्रयत्न केले. त्यानी शाळा, महाविद्यालयातील मुलामध्ये सुसंस्कार घडविण्यासाठी प्रयत्न केले. बापूजीनी विविध अडचणीवर मात करून माध्यमिक, उच्चमाध्यमिक, उच्च शिक्षण, तंत्र शिक्षण, शिक्षक प्रशिक्षण, इत्यादी स्तरावर शिक्षण प्रसाराचे कार्य केले.

विसाव्या शतकात अनेक शिक्षण प्रेमी समाजसुधारकांनी समाज परिवर्तनाचे शिक्षण हे माध्यम मानले आणि शिक्षणप्रसाराचे कार्य केले. स्वातंत्र्यानंतर शिक्षणात बदल घडवून आणण्याची गरज निर्माण झाली. शिक्षणात बदल घडवून आणण्यासाठी बापूजीनी "ज्ञान विज्ञान आणि सुसंस्कार" यासाठी शिक्षण प्रसार.

या ध्येय वाक्याचा स्विकार केला आणि विद्यार्थ्यांवर सुसंस्कार घडविण्यासाठी प्रयत्न केले. त्यांनी केलेल्या या कार्याची योग्य प्रतीमा समाजाच्या निदर्शनास येईल, त्यांचे कार्य शिक्षण क्षेत्रात काम करणा-यांना प्रेरणादायी व स्फूर्तीदायक ठरेल. हा अभ्यास समाज सेवक, समाजसेवी-संस्था, प्रशासन अधिकारी, शिक्षणसंस्था, शिक्षणतज्ञ, संशोधक व सर्व समाजाला उपयुक्त ठरेल.

## १.५ संशोधनाची व्याप्ती व मर्यादा -

शिक्षण महर्षि डॉ. बापूजी साळुंखे यांनी शिक्षण प्रसार करताना सर्व शैक्षणिक स्तरांचा विचार केला आहे. त्यांनी माध्यमिक, उच्च माध्यमिक, तंत्रशिक्षण, उच्चशिक्षण, शिक्षक प्रशिक्षण या स्तरावर शिक्षण प्रसार केला. त्या स्तरांचा विचार प्रस्तुत संशोधनात केला आहे. या शैक्षणिक स्तरा-पुरताच हा अभ्यास मर्यादित आहे.

बापूजींनी स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेची स्थापना सन १९५४ मध्ये केली. त्यापासून सन १९८७ पर्यंत म्हणजे त्यांच्या हयातीपर्यंतचा काळ अभ्यासासाठी घेतला आहे. बापूजींच्या शिक्षण प्रसार कार्याचा व्याप महाराष्ट्र राज्यातील कांही जिल्हयात व कर्नाटक राज्यातील बेळगांव जिल्हयात झाला आहे. परंतु अभ्यासकाने फक्त महाराष्ट्र राज्यातील त्यांचे कार्य अभ्यासासाठी निवडले आहे.

महाराष्ट्र राज्यातील कोल्हापूर, सातारा, सांगली, पुणे, सिंधुदुर्ग, रायगड, ठाणे या जिल्हयातील बापूजींच्या शैक्षणिक कार्या-पुरते व १९८७-८८ सालातील संस्थेच्या सद्यस्थिती पुरते हे संशोधन मर्यादित आहे.

## १.६ संबधित संशोधनाचा अभ्यास -

संशोधकाने प्रस्तुत संशोधनाकरिता अशा प्रकारचे कांही संशोधन झाले आहे, की नाही याची जाणीवपूर्वक नोंद घेतली आहे. कारण की, अशा विषयाची नोंद पुन्हा होवू नये, तसेच संशोधकाला संबंधित संशोधनाच्या अभ्यासातून कांही सिध्दांत संशोधनाचे तंत्र, आधार सामुग्री व निष्कर्ष याबाबतीत मार्गदर्शक म्हणून उपयोग करून घेता येतो. पूर्वी झालेल्या संबधित संशोधनातील अपूर्णता टाळून नवा दृष्टीकोन प्रस्तुत संशोधनात मांडता येतो. म्हणून संशोधकाने संबंधित संशोधनाचा अभ्यास खालील प्रमाणे दिला आहे.

अ] डॉ. दी. जे.के. - यांनी रविंद्रनाथ टागोराच्या कार्याबाबत संशोधन केले आहे. संशोधन विषयाचे नांव पुढीलप्रमाणे आहे.

" TAGORES CONTRIBUTION TO EDUCATION FOR INTERNATIONAL UNDERSTANDING"3

" आंतरराष्ट्रीय सामंजस्यासाठी रविंद्रनाथ टागोरांचे शैक्षणिक योगदान" हा संशोधन प्रबंध पी.एच्. डी. साठी विश्वभारती विद्यापीठास सन १९७२ साली सादर केला. युध्दाचे मुळ मानवी मनात आहे. असे टागोरांचे मत होते. त्यामुळे त्यांनी शांती निकेतनमध्ये आंतर राष्ट्रीय सामंजस्याचा विचार केला. आंतरराष्ट्रीय सामंजस्याची पार्श्वभूमी व सद्याची स्थिती याचा विचार या प्रबंधात केला आहे.

संशोधनाची उद्दिष्टे -

१] सांस्कृतीक व परस्पर सहकार्याची वाढ होण्यासाठी शांती निकेतन संस्थेने केलेल्या कार्याचा शोध घेणे.

२] रविंद्रनाथ टागोरांच्या शैक्षणिक विचाराचा शोध घेणे.

३] रविंद्रनाथ टागोराना अभिप्रेत असणा-या शिक्षण व्यवस्थेचा शोध घेणे.

कार्य पध्दती -

या संशोधनात ऐतिहासिक पध्दतीचा वापर केला आहे. रविंद्रनाथांची भाषणे, रविंद्रनाथ टागोरांच्या कार्यासंबंधीचे लेख, व चर्चा यातून संशोधकाने माहिती मिळविली व कांही निष्कर्ष काढले आहेत.

निष्कर्ष -

१] मनुष्याला परस्परांबद्दल विश्वास वाटला तरच परस्परांना समजावून घेण्याची वृत्ती वाढेल.

२] विविध प्रकारच्या शैक्षणिक प्रक्रियेमुळे मानवा-मानवातील सहकार्यवृत्ती वाढेल.

३] सांस्कृतिक व परस्पर सहकार्याची वाढ होण्यासाठी शांतीनिकेतन सारख्या संस्था निर्माण झाल्या पाहिजेत.

ब] डॉ. आर. ए. कडियाळ - यांनी कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या कार्यावर संशोधन केले आहे. संशोधनाचा विषय खालीलप्रमाणे आहे.

" A CRITICAL STUDY OF THE CONTRIBUTION. OF KARMVEER DR.BHAURAO PATIL TO THE EDUCATIONAL THOUGHTS, PRACTICES AND DEVELOPMENT OF EDUCATION IN THE STATE OF MAHARASHTRA." 4.

" महाराष्ट्र राज्यातील शिक्षण विषयक विचार, शिक्षणाची कार्यवाही व शिक्षणाचा विकास याबाबत कर्मवीर डॉ. भाऊराव पाटील यांनी दिलेल्या शैक्षणिक योगदानाचा चिकित्सक अभ्यास" हा संशोधन प्रबंध पी.एच्.डी. पदवीसाठी सन १९७९ मध्ये शिवाजी विद्यापीठास सादर केला.

संशोधनाची उद्दिष्टे -

१] कर्मवीर डॉ. भाऊराव पाटील यांनी शिक्षणात दिलेल्या योगदानाचा शोध घेणे.

२] कर्मवीर डॉ. भाऊराव पाटील यांच्या शैक्षणिक प्रयोगाचा अभ्यास करणे

३] कर्मवीर डॉ. भाऊराव पाटील यांच्या शैक्षणिक तत्वज्ञानाचा अभ्यास करणे.

कार्यपध्दती -

हे संशोधन करताना सर्वेक्षण पध्दतीचा वापर केला आहे. प्रश्नावली, मुलाखती, विविध शाखांचे अहवाल व शाखाना भेटी यातून माहिती मिळविली आहे.

निष्कर्ष -

१] शिक्षण हे समाजपरिवर्तनाचे साधन आहे असे भाऊराव पाटील यांचे मत होते.

२] स्वातंत्र्य व राष्ट्रीय ऐक्य हवे असेल तर बहुजन समाजाला शिक्षण मिळाले पाहिजे.

३] सर्व जातीच्या मुलासाठी एकच वसतिगृह असले पाहिजे.

४] शिक्षण सर्वांना मोफत मिळाले पाहिजे.

क] श्री विलास शंकर पोतदार - ~~यांनी राजर्षि~~

यांनी राजर्षि छत्रपती शाहू महाराज यांच्या शैक्षणिक कार्याबाबत संशोधन केले आहे. त्यांचा संशोधनाचा विषय खालीलप्रमाणे होता.

" A CRITICAL STUDY OF THE CONTRIBUTION OF RAJARSHI CHHATRAPATI SHAHUMAHARAJ TO THE FIELD OF EDUCATION IN KOLHAPUR STATE"5.

कोल्हापूर संस्थानात राजर्षि शाहू महाराजांनी शिक्षण क्षेत्रात केलेल्या कार्याचा चिकित्सक अभ्यास." असा संशोधनाचा विषय होता.

हा संशोधन प्रबंध एम्.फील्. पदवीसाठी सन १९८६ मध्ये शिवाजी विद्यापीठास सादर केला.

संशोधनाची उद्दिष्टे -

१] शाहू महाराजांनी प्राथमिक, माध्यमिक, उच्च शिक्षण या स्तरावर केलेल्या योगदानाचा शोध घेणे.
२] शाहू महाराजांनी सुरु केलेल्या वसतिगृह चळवळीचा अभ्यास करणे.
३] शाहू महाराजांनी शिक्षणाचा जातीभेद निर्मूलनासाठी कसा वापर केला. ते पाहणे.

कार्यपध्दती -

या संशोधनासाठी ऐतिहासिक पध्दतीचा वापर केला आहे. संशोधकाने प्राथमिक आधार व दुय्यम आधार यांचा वापर करून माहिती मिळवली आहे. छत्रपतीच्या जीवनावरील प्रकाशित साहित्याचा वापर केला आहे.

निष्कर्ष - १] शाहू महाराजांनी मोफत व सक्तीचे शिक्षण सुरु केले.
२] प्राथमिक शिक्षण सर्वासाठी मोफत केले .
३] वसतीगृह चळवळ राबविली.
४] हुशार विद्यार्थ्यांना विद्यावेतन दिले.

१.७ संशोधनाची कार्यपध्दती -

अभ्यासकाने प्रस्तुत संशोधनासाठी सर्वेक्षण पध्दतीचा वापर केला आहे. शं. श. मुळे आपल्या शैक्षणिक संशोधनाची मूलतत्त्वे या पुस्तकात सर्वेक्षण पध्दती संबंधी लिहतात.

> " सर्वेक्षण म्हणजे निव्वळ माहिती संकलीत करणे ऐवढयापुरते मर्यादित नाही. त्यात मापन , वर्गीकरण, अर्थनिर्वचन, निष्कर्ष व पत्रके तयार करणे इत्यादी गोष्टी येतात. तसेच प्रयोग शीलतेची अनुमान काढण्याची प्रवृत्तीही त्यात आढळते. "६

अभ्यासकाने माहिती मिळविण्यासाठी प्रश्नावली, मुलाखती, विविध शाखाना भेटी, तसेच प्रकाशित साहित्याचा अभ्यास या साधनाचा उपयोग केला.

१] प्रश्नावली-

अभ्यासकाने संशोधनाच्या उद्दिष्टानुसार प्रश्नावली तयार करून १० तज्ञ व्यक्तींना तिचा आराखडा पाहाण्यास दिला. त्यांच्याशी चर्चा करून त्यात बदल करून प्रश्नावलीस अंतीम स्वरूप दिले. प्रश्नावली मधून व्यक्तीगत शंका दूर करता येत नाहीत. तसेच कांही वेळा योग्य उत्तरे मिळत नाहीत अशा कांही मर्यादेमुळे संशोधकाने ९ जून १९८८ या बापूजींच्या प्रथम जयंती दिवशी प्रत्यक्ष स्वामी विवेकानंद संस्थेच्या कोल्हापूर येथील कार्यालयात हजर राहून संस्थेचे सदस्य, प्राचार्य, मुख्याध्यापक प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्याकडून खालीलप्रमाणे प्रश्नावली भरून घेतल्या. त्यांची यादी [परिशिष्ट क्रमांक ४ मध्ये ] दिली आहे.

| | | |
|---|---|---|
| संस्थेतील सदस्य | .. | ५ |
| संस्थेतील प्राचार्य | .. | ४ |
| संस्थेतील प्राध्यापक | .. | १८ |
| संस्थेतील मुख्याध्यापक | .. | ५ |
| संस्थेतील शिक्षक | .. | १२ |
| संस्थेतील शिक्षकेत्तर कर्मचारी | .. | ६ |
| | | ५० |

दिलेल्या एकूण ८० प्रश्नावलीपैकी अभ्यासकास ५० प्रश्नावल्या भरून परत मिळाल्या त्याचे प्रमाण शेकडा [६२.५] होते. यावरून प्रश्नावलीतील माहिती पुरेशी प्रातिनिधीक आहे.

प्रश्नावलीचे स्वरूप - प्रश्नावलीचे स्वरूप पुढीलप्रमाणे दिले असून प्रश्नावली [परिशिष्ट क्रमांक २ मध्ये ] दिली आहे. प्रतिसादकांची माहिती व उद्दिष्टे यावरून प्रश्नावलीचे अ, ब, क, ड, इ, ई असे सहा भाग विभाग करण्यांत आले आहेत.

| विभाग | प्रश्न क्रमांक | संबंधित क्षेत्र |
|---|---|---|
| अ] | १ ते ५ | प्रतिसादकांची माहिती. |
| ब] | १ ते ५ | बापूजींच्या व्यक्तीगत जीवनाविषयी माहिती. |
| क] | १ ते ३ | बापूजीनी माध्यमिक, उच्च तांत्रिक, शिक्षक प्रशिक्षण या संबंधी केलेल्या कार्याची माहिती. |
| ड] | १ ते ३ | बापूजींच्या स्त्री शिक्षण प्रसार कार्यासंबंधी माहिती. |
| इ] | १ ते ४ | बापूजीनी वसतिगृहातील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी केलेल्या प्रयत्नांची माहिती. |
| ई] | १ ते ३ | बापूजीनी सामाजिक एकता व जातीभेद निर्मूलनासाठी केलेल्या प्रयत्नांची माहिती. |

२] मुलाखती -

बापूजी साळुंखे यांच्या कार्यात मदत करणाऱ्या व्यक्तींच्या तसेच संस्थेतील कांही कर्मचाऱ्यांच्या मुलाखती अभ्यासकाने घेतल्या आहेत. त्यासाठी अभ्यासकाने मुलाखत अनुसूची तयार केली होती ती [परिशिष्ट ३ मध्ये दिली आहे.] ज्यांच्या मुलाखती घ्यावयाच्या त्यांना १५ दिवस अगोदर मुलाखत पाठविली होती. मुलाखत घेतलेल्या व्यक्तींची यादी [परिशिष्ट ५ मध्ये] दिली आहे. मुलाखत घेतलेल्या व्यक्तीचे वर्गीकरण खालीलप्रमाणे केले होते.

| | | |
|---|---|---|
| संस्थेचे सदस्य | - | ५ |
| प्राचार्य | - | ६ |
| प्राध्यापक | - | १० |
| मुख्याध्यापक | - | ३ |
| शिक्षक | - | १२ |
| शिक्षकेतर कर्मचारी | - | ४ |
| एकूण | - | ४० |

३] विविध शाखाना भेटी

बापूजी साळुंखे यांनी "श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था स्थापन केली. या संस्थेच्या विविध शाखा सुरु झाल्या. त्यापैकी कांही शाखाना भेटी देवून अभ्यासकाने माहिती मिळविली. भेटी दिलेल्या शाखांची यादी [ परिशिष्ट ६ मध्ये दिली आहे. ] या भेटी प्रत्येक जिल्हयातील कांही माध्यमिक विद्यालये, उच्च माध्यमिक विद्यालये, तंत्रविद्यालये, महाविद्यालये, अध्यापक विद्यालये व महाविद्यालये यांना भेटी देवून माहिती मिळविली आहे.

४] प्रकाशित साहित्य -

अभ्यासकाने शिक्षण महर्षि डॉ. बापूजी साळुंखे यांच्या जीवनावरील सर्व प्रकाशित साहीत्यांचा अभ्यास केला आहे. ते साहित्य खालीलप्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| डॉ. गजानन सुर्वे | : | 'शिक्षण महर्षि परमपूज्य बापूजी साळुंखे व्यक्ती आणि कार्य' कोल्हापूर, बापूजी साळुंखे षष्टयब्दिपूर्ती समिती, १९८०. |
| डॉ. एस्. एस्. भोसले | : | 'महाराष्ट्राचे शिक्षण प्रयोग आणि परंपरा', कोल्हापूर बापूजी साळुंखे षष्ट्यब्दिपूर्ती समिती १९८०. |
| बी. डी. पाटील | : | 'डॉ. बापूजी साळुंखे [व्यक्ती कार्य आणि आठवणी]' बेळगांव, मनिषा प्रकाशन, १९८६. |
| संभाजी पाटणे | : | 'शिक्षण महर्षि बापूजी' सातारा सुशिल प्रकाशन, १९८२ |
| के. एस्. नाईक | : | 'संस्कृती' अंक ४ था [सन १९८५-८६] |
| टी. ए. गवळी | : | 'संस्कृती' अंक ६ वा [सन १९८७-८८] |
| ॲड. राम होगले | : | साप्ताहिक 'रामप्रताप' "बापूजी साळुंखे विशेषांक" कराड, आझाद प्रकाशन, १९८७. |

अशा प्रकारे अभ्यासकाने शिक्षण महर्षि डॉ. बापूजी साळुंखे यांच्या शैक्षणिक कार्याविषयी माहिती मिळविण्यासाठी प्रश्नावली, मुलाखती, विविध शाखाना भेटी, प्रकाशित साहित्य इत्यादी साधनांचा वापर केला.

## १.८ प्रकरणाचे सुसूत्रीकरण -

प्रश्नावली, मुलाखती, संस्थेच्या विविध शाखाना भेटी, प्रकाशित साहित्य या साधनाद्वारे अभ्यासकाने माहिती मिळविली नंतर मिळविलेल्या माहितीचे पृथक्करण व अर्थनिर्वचन करून अभ्यासकाने कांही निष्कर्ष काढले आहेत व कांही शिफारसी केल्या आहेत. हे सर्व खालील प्रकरणाप्रमाणे सादर केले आहे.

प्रकरण - १ ले - या प्रकरणात विषय प्रवेश, संशोधनाचा विषय, संशोधन विषयाचे महत्व, संशोधनाची उद्दिष्टे, संशोधनाची व्याप्ती व मर्यादा, संबंधित संशोधनाचा अभ्यास, संशोधनाची कार्यपध्दती, प्रकरणाचे सुसूत्रीकरण या बाबतची माहिती दिली आहे.

प्रकरण - २ रे या प्रकरणात शिक्षण महर्षि डॉ. बापूजी साळुंखे यांचे संक्षिप्त जीवनचरित्र दिले आहे. बापूजींचा जन्म, बालपण, शिक्षण, कौटुंबिक जीवन, सामाजिक व राजकीय कार्य, रयत शिक्षणसंस्थेत प्रवेश व कार्य, श्री. स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेची स्थापना, बापूजींच्या जीवनातील कांही ठळक घटना सारांश रूपाने दिल्या आहेत.

प्रकरण -३ रे या प्रकरणात महाराष्ट्रातील विसाव्या शतकातील सामाजिक आणि शैक्षणिक पार्श्वभूमी बद्दल माहिती दिली आहे.

प्रकरण-४ थे १] प्रश्नावलीच्या साहाय्याने मिळविलेल्या माहितीचे पृथ:करण करून या प्रकरणात खालील प्रमाणे अर्थनिर्वचन केले आहे.

अ] प्रतिसादकांची माहिती ब] बापूजीचे व्यक्तीगत जीवन व शिक्षण विषयक दृष्टीकोन

क] बापूजींचे शिक्षण प्रसार कार्य ड] बापूजींचे स्त्री शिक्षणाबाबतचे कार्य.

इ] बापूजींचे वसतिगृहा संबंधीचे कार्य. ई] बापूजींचे समाज परिवर्तन व जातीभेद निर्मूलनासंबंधी कार्य

२] मुलाखतीच्या सहाय्याने मिळविलेल्या माहितीचे पृथ:करण व अर्थनिर्वचन.

अ] बापूजी साळुंखे यांचे व्यक्तीगत जीवन ब] बापूजींचे शिक्षण प्रसार कार्य क] बापूजींचा स्त्री शिक्षणविषयक दृष्टीकोन व कार्य ड] बापूजींचे सामाजिक एकता व जातीभेद निर्मूलनाबाबतचे कार्य.

इ] विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी केलेले कार्य.

ई] शिक्षण संस्थेचे ध्येय.

3] शिक्षण महर्षि डॉ. बापूजी साळुंखे यांनी सुरु केलेल्या विविध शाखाना भेटी देवून मिळविलेल्या माहितीचे अर्थनिर्वचन.

अ] बापूजी साळुंखे यांनी स्थापन केलेली कांही माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालये.

ब] बापूजी साळुंखे यांनी स्थापन केलेली कांही महाविद्यालये.

क] बापूजी साळुंखे यांनी स्थापन केलेली कांही तंत्र विद्यालये.

ड] बापूजी साळुंखे यांनी स्थापन केलेली कांही अध्यापक विद्यालये व अध्यापक महाविद्यालये.

प्रकरण ५ वे – या प्रकरणात बापूजी एक शिक्षण तज्ञ या दृष्टिकोनातून त्यांनी मांडलेले विचार व त्यांचे शैक्षणिक तत्वज्ञान या बाबतची माहिती सारांश रूपाने दिली आहे.

प्रकरण ६ वे – या प्रकरणात शिक्षण महर्षि डॉ. बापूजी साळुंखे यांनी माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण, उच्च शिक्षण, तंत्रशिक्षण शिक्षक प्रशिक्षण व वसतिगृहे यासंबंधी केलेल्या कार्याचा थोडक्यात आढावा घेतला आहे.

प्रकरण ७ वे – या प्रकरणात केलेल्या संशोधनाचा सारांश, निष्कर्ष व शिफारशी यासंबंधी माहिती दिली आहे. तसेच पुढील संशोधनासाठी विषय दिले आहेत.

:=:=:=:=:=

## संदर्भ


१] सी. डी. देशपांडे : महाराष्ट्राचा भूगोल
नवी दिल्ली, नॅशनल बुक ट्रस्ट प्रकाशन, १९७६, पृष्ठ क्रं. ३.

२] Carter V. Good : Dictionary of Education
Newyork, Mc Graw Hill Company, 1959, P.566.

३] M.B.Buch : Second Survey of Research in Education.
Baroda, Research and Development Publication 1979, P.No.31.

४] R.A. Kadiyal : Karmveer Bhaurao Patil his Contribution to Education in Maharashtra.(Ph.D.thesis)
Kolhapur, Shivaji University 1979.

५] V.S.Pawar : A Critical Study of the Contribution of Rajarshi Shahu Maharaj to the field of Education, in Kolhapur.
( M.Phil Dissertation)
Kolhapur, Shivaji University, 1986.

६] शं. श. मुळे व वि. तु. उमाटे : शैक्षणिक संशोधनाची मुलतत्वे
नागपूर, साहित्य प्रसार केंद्र प्रकाशन १९७७ पृष्ठ क्र.१११.


::::::::::